# खासगी वैद्यकीय महाविद्यालयांचे ईडब्ल्यूएस आरक्षण अखेर रद्द!

मुंबई (सरकार): खासगी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (ईडब्ल्यूएस) १० टक्के आरक्षण लागू करण्याचा निर्णय अखेर सरकारने रद्द केला असून, यंदा प्रवेश पूर्वीप्रमाणे होणार आहेत.

विद्यार्थ्यांचे पालक आणि शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी तीव्र आक्षेप नोंदवल्यानंतर, आरक्षणाबाबत सरकारकडून बुधवारी अधिकृत स्पष्टीकरण देण्यात आले आहे. जागा वाढवल्याशिवाय ईडब्ल्यूएस आरक्षणाची अंमलबजावणी होणार नसल्याचे वैद्यकीय शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे. मंगळवारी पालक आणि कार्यकर्त्यांच्या प्रतिनिधीमंडळाने वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांची भेट घेऊन, यासंदर्भातील आपली नाराजी मांडली होती. या चर्चेनंतरच विभागाकडून बुधवारी आरक्षण धोरणावर नव्याने खुलासा करण्यात आला आहे. ईडब्ल्यूएस आरक्षण हे खासगी महाविद्यालयांत लागू करताना, त्या संख्येत समांतर वाढ झाल्याशिवाय ते घटनात्मकदृष्ट्या योग्य ठरत नाही. त्यामुळे जागा वाढविल्याशिवाय आरक्षण लागू होणार नाही, असे स्पष्ट करत, राज्य शासनाने केंद्र सरकारच्या २०१९ मधील धोरणाचीच पुनरावृत्ती केली आहे. यंदाच्या सीईटी प्रवेश पुस्तिकेमध्ये प्रथमच खासगी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये ईडब्ल्यूएस आरक्षणाचा उल्लेख होता. त्याआधी कोणतीही अधिसूचना, शासन निर्णय वा जाहीर घोषणा झालेली नव्हती. त्यामुळे पालकांना हा धक्का होता. ईडब्ल्यूएस आरक्षण लागू करताना जागा वाढवणे बंधनकारक आहे, असा सर्वोच्च न्यायालयाचा निवाडा आहे. ईडब्ल्यूएस आरक्षण लागू केल्यास, सरसकट खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या जागा कमी झाल्या असत्या आणि गुणवत्ताधिष्ठित प्रवेशप्रक्रियेवर परिणाम झाला असता, अशा तक्रारी होत्या.




सायं.दैनिक बीड ■ E-mail : beedsarkar @ Gmail.com ■ किंमत: १ रू. ■ पाने : ४

सरकार

संपादक-आदोडे साहस

Evening Daily beedsarkar



बीड महाराष्ट्र ■ वर्ष १२ वे ■ अंक २९३ वा ■ शनिवार २ ऑगस्ट २०२५ ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 पोस्टल दिनांक ३ ऑगस्ट २०२५ पाने ४ किंमत १ रू.

Beed MAHARASHTRA ■ Year 12 Issu 293 ■ Saturday 2 August 2025 ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-248/2025-2027



## बीड जिल्हा देशात गाजला

# अयोध्येतील राम मंदिर उडविण्यासाठी तरूणाला ऑफर;पाकिस्तानातून मॅसेज

बीड (सरकार): शिरूर कासार येथील एका युवकाला सोशल मीडियावरून अयोध्येतील श्रीराम मंदिर उडवण्याची धमकी देणारा मेसेज मिळाल्याने खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, हा मेसेज पाकिस्तानातून आल्याचे उघडकीस आले असून, संबंधित व्यक्तीने आपली ओळख पटवण्यासाठी कराचीमधील लोकेशनही पाठवले आहे, असे पीडित युवकाने सांगितले.

या प्रकारामुळे परिसरात चिंता पसरली असून, संबंधित युवकाने शिरूर कासार पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्याने दिलेल्या माहितीप्रमाणे, सोशल मीडियावर संवाद साधताना एका अनोळखी व्यक्तीने त्याला राम मंदिर उडवण्याच्या कटात सहभागी होण्याची ऑफर दिली. यासाठी त्याला एक लाख रुपये देण्याचेही आश्वासन देण्यात आले होते. मेसेजमध्ये स्पष्ट उल्लेख होता की अयोध्येतील राम मंदिर आरडीएक्ससारख्या स्फोटकांनी उद्ध्वस्त करायचे असून, या कामात सहभागी होण्यासाठी एकूण ५० जणांची आवश्यकता आहे. प्रत्येकाला एक लाख रुपये देण्यात येणार असल्याचेही नमूद करण्यात आले होते. शिवाय, स्फोटक पुरवण्याची जबाबदारीही संशयित व्यक्तीने घेण्याचे सांगितले.याप्रकरणी पोलिसांनी गंभीर दखल घेत गुन्हा नोंदवला असून, पुढील तपास सुरु आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून मिळालेली ही धमकी देशाच्या सुरक्षेला आव्हान ठरणारी असून, यामागे कुणाचा हात आहे, हे शोधण्याचे प्रयत्न पोलीस करत आहेत.

## परळीत आजवर चाळीस खून, केवळ चार आले समोर-खा.सोनवणे

बीड (सरकार): जिथे अन्याय होतो, तिथे मनोज जरांगे पाटील असतात. संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांसाठी दादांनी लढा दिला, आता महादेव मुंडे यांच्या कुटुंबीयांसाठी लढत आहेत. परळीत असे चाळीस खून आजवर झाले, पण समोर केवळ चारच आल्याचा खळबळजनक आरोप खा.बजरंग सोनवणे यांनी केला.



स्व.महादेव मुंडे यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी, या प्रकरणातील आर-ोपींच्या अटकेच्या मागणीसाठी व्यापक बैठक बीडमध्ये पार पडली. शुक्रवारी दुपारी कॅनॉल रोड भागात झालेल्या या बैठकीत खा, बजरंग सोनवणे यांनी खळबळजनक दावे केले. खा. सोनवणे म्हणाले की, देश विघातक कृत्य करणारी लष्कर ए तोयबा संघटना आहे, त्या दहशतवादी संघटनेपेक्षाही घातक अशी संघटना परळीत आहे. असं आम्ही बोललो तर काहीजण म्हणतात आमच्या मातीला बदनाम करू नका, आमच्या जातीला बदनाम करू नका. पण हे असे कृत्य होत असताना पोलिस यंत्रणा काय करत आहे? परळीत आजवर चाळीस खून झाले, समोर फक्त चार आले असा आरोप खा. सोनवणे यांनी केला.

महादेव मुंडे यांच्या खून प्रकरणात काही आर-ोपींना अटक झाल्याची चर्चा आहे, परंतु असे काहीही झालेले नाही. केवळ दिशाभूल करण्याचे काम सुरू असल्याचे देखील खा. सोनवणे यांनी यावेळी सांगितले. आ. सोळंकेंच्या हत्येचा कट होता गलथर शिवसेनेचे जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांनी आपल्या भाषणात खळबळजनक खुलासे केले. बीडमधील परिस्थितीला काही लोक जबाबदार आहेत. संवेदनशील प्रकरणात देखील ते सोशल मिडीयावर चुकीच्या पोस्ट करतात. याबाबत मी त्यांच्या नेत्यांना अनेकदा सांगितले पण फरक पडला नाही. पण तेच नेते अशा समर्थकांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना दिसतात. काही दिवसांपूर्वी बीडमध्ये जाळपोळ झाली, वे षडयंत्र होते.

## पीएम किसान योजनेचा २० वा हप्ता आजपासून शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होण्यास सुरुवात

नवी दिल्ली (वृत्तसंस्था) प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा २० वा हप्ता आज (२ ऑगस्ट) पासून पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये जमा होण्यास सुरुवात झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आज वाराणसी येथे विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन करत असून त्याच कार्यक्रमात त्यांनी या योजनेचा हप्ता वितरित केला.



या योजनेअंतर्गत देशभरातील १० कोटीहून अधिक शेतकऱ्यांना प्रत्येकी २,००० रुपयांचा हप्ता मिळणार आहे. एकूण २०,००० कोटी रुपयांपेक्षा अधिक निधी थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केला जाणार असल्याची माहिती केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी दिली. त्यांनी सांगितले की, आज 'किसान उत्सव दिवस' साजरा होत असून, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी केंद्र सरकारकडून १.७५ लाख कोटी रुपयांचे खत अनुदानही देण्यात येत आहे. पीएम किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना दरवर्षी ६,००० रुपयांची आर्थिक मदत तीन समान हप्त्यांमध्ये (२,००० रुपये प्रत्येकी) थेट बँक खात्यावर DBT (Direct Benefit Transfer) प्रणालीद्वारे दिली जाते. यापूर्वीचा हप्ता फेब्रुवारी महिन्यात जमा करण्यात आला होता.

## तुळजाभवानी मंदिरातील शस्त्र पूजनाची तलवार गायब;पुजाऱ्यांचा खळबळजनक दावा

धाराशिव (सरकार): महाराष्ट्राची कुलस्वामीनी असलेल्या तुळजाभवानी मंदिरातील खजिना खोलीतून शस्त्र पूजनासाठी वापरली जाणारी विशेष तलवार गहाळ झाल्याचा गंभीर आरोप स्थानिक पुजाऱ्यांनी केला आहे. ही तलवार मंदिर संस्थानाच्या खजाना खोलीतून गायब झाली आहे. दरम्यान, ही तलवार केवळ धार्मिकच नव्हे, तर अध्यात्मिकदृष्ट्याही अत्यंत महत्वाची मानली जाते.

पद्मश्री गणेश्वर द्रविड शास्त्री यांच्याकडून पूजा करून घेत शस्त्रातील तत्त्व आणि शक्ती



तलवारीमध्ये टाकली आहे. तसंच होम हवन करून तुळजाभवानीची शक्ती तलवारीमध्ये काढून घेतल्याचा दावाही पुजाऱ्यांनी केला आहे. मंत्रोपचाराने देवीच्या ८ शस्त्रातील तत्व आणि शक्ती तलवारीमध्ये काढून देवीची तलवार गहाळ केल्याचा आरोपही पुजाऱ्यांनी केला आहे. पुजाऱ्यांच्या या दाव्यामुळे तुळजापुरात एकच खळबळ उडाली आहे. तलवार खजिना खोलीतून नेमकी कशी गायब झाली, याबाबत कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. मात्र गायब झालेली तलवार तात्काळ देवीच्या चरणी परत आणण्यात यावी, अशी मागणी पुजाऱ्यांनी केली आहे.

## लोकसभा निडवणुकीत १५ जागा बनावटपणे जिंकल्या नसत्या तर मोदी पंतप्रधान नसते-गांधी

नवी दिल्ली (वृत्तसंस्था): काँग्रेसचे नेते आणि लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी २०२४ मध्ये पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीवर गंभीर आरोप करत ती निवडणूक बनावट असल्याचा दावा केला आहे. दिल्ली येथे झालेल्या 'वार्षिक कायदा संमेलन २०२५' मध्ये बोलताना गांधींनी भारतीय निवडणूक आयोगावर थेट प्रहार केला आणि संपूर्ण निवडणूक यंत्रणेलाच मृत घोषित केले. राहुल गांधी म्हणाले, भारताची निवडणूक प्रणाली आता मृत झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी खूपच कमी बहुमतावर सत्तेवर आहेत. जर १५ जागा बनावटपणे जिंकल्या गेल्या नसत्या, तर आज ते पंतप्रधान असतेच नाहीत. आम्ही लवकरच देशासमोर पुरावे सादर करू.

## ''अर्बन नक्षलसारखे वागाल, तर तुम्हालाही अटक होईल''

### राज ठाकरेंच्या आव्हानाला देवेंद्र फडणवीसांचं प्रत्युत्तर!

मुंबई (सरकार): शेतकरी कामगार पक्षाच्या (शेकाप) वर्धापन दिन मेळाव्यात बोलताना राज ठाकरे यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. जनसुरक्षा कायद्यावरून त्यांनी फडणवीस सरकारला लक्ष्य केलं. आम्हाला अर्बन नक्षल म्हणणाऱ्यांनी आधी स्वतःची पात्रता तपासावी, असं ते म्हणाले. तसेच, आम्हाला फक्त अटक करून दाखवा, असं आव्हानही त्यांनी राज्य सरकारला दिलं.

दरम्यान, राज ठाकरेंच्या याच आव्हानाला आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. जर तुम्ही अर्बन नक्षलसारखे वागाल, तर तुम्हाला अटक केली जाईल, असं त्यांनी म्हटलं. नागपूरमध्ये माध्यमांशी बोलताना त्यांनी राज ठाकरेंच्या टीकेला उत्तर दिलं.

हा कायदा त्यांच्यासाठी बनलेला नाही, मग त्यांना अटक का होईल? जर तुम्ही अर्बन नक्षलसारखे वागाल, तरच अटक होईल. तुम्ही तसं वागत नाही, त्यामुळे अटक करण्याची गरज नाही. अशा प्रकारे जे वागतात, त्यांच्यासाठीच तो



कायदा आहे, अशी प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी दिली. पुढे बोलताना त्यांनी स्पष्ट केलं की, हा कायदा आंदोलकांविरोधात नाही. सरकारविरोधात बोलण्याची सर्वांनाच मुभा आहे. तसेच, राज ठाकरे अशा प्रकारची विधाने करत आहेत, याचा अर्थ त्यांनी तो कायदा अजून वाचलेलाच नाही, असा टोलाही त्यांनी लगावला.

## एकदा अटक करून दाखवा, राज ठाकरेंचे सरकारला खुलं आव्हान

मुंबई (सरकार) महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) अध्यक्ष राज ठाकरे यांनी पनवेल येथील शेतकरी कामगार पक्षाच्या (शेकाप) वर्धापन दिन मेळाव्यात राज्य सरकार आणि केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. एकदा अटक करून दाखवा, असा थेट इशारा देत त्यांनी मराठी माणसांच्या हक्कांसाठी आणि रायगडच्या शेतकऱ्यांच्या जमिनींसाठी लढण्याचा निर्धार व्यक्त केला.

शेकापचा हा मेळावा ऐतिहासिक ठरला, कारण यावेळी राज ठाकरे आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते संजय राऊत एकाच व्यासपीठावर आले.

शेतकरी कामगार पक्षाची स्थापना ३ ऑगस्ट १९४७ रोजी झाली. स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेला हा महाराष्ट्रातील एकमेव राजकीय पक्ष आहे, याचा राज ठाकरे यांनी विशेष उल्लेख केला. लाल ध्वजाच्या मंचावर दोन भगवे ध्वज आले, असे सांगत त्यांनी शेकाप आणि मनसेच्या वैचारिक जवळीकीवर भाष्य केले.

यापूर्वी १९८१ साली शिवसेनेच्या अधिवेशनात कम्युनिस्ट नेते श्रीपाद अमृत डांगे यांच्यासारख्या दिग्गजांनी हजेरी लावली होती, याची आठवणही त्यांनी करून दिली.



# संपादकीय

## बोटावर निभावलं!

'जीवावर बेतलेलं अखेर बोटावर निभावलं' म्हणून राज्याचे नूतन क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांनी गुरुवारी रात्री सुटकेचा निःश्वास टाकला असेल. नुकत्याच पार पडलेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात सभागृहात बसले असताना कोकाटे यांनी आपल्या मोबाइलवर पत्त्यांचा डाव उघडला आणि करमणूक म्हणून 'वाईच' दोन-चार खेळ्या केल्या. त्या नेमक्या प्रेक्षक गॅलरीतून फोनच्या कॅमेऱ्याने कोणीतरी टिपल्या. त्यावरून बराच गदारोळ झाला. कोकाटेंच्या जागी दुसरा कोणी असता, तर विषय एवढा चिघळला नसता. पण, कोकाटे हे व्यक्तिमत्त्वच कोणी हलक्यात घ्यावं असं नाही. त्यामुळे, सगळ्यांनीच त्यांना गांभीर्याने घेतलं आणि कोकाटे फसत गेले. विषय खोलात जातोय याचं भान कोकाटेंना फार उशिरा आलं. केवळ या प्रकरणातच असं नाही, स्वतःच्याच मिजाशीत वावरायची सवय असलेल्या कोकाटेंबाबत हे नेहमीच होतं. अगदी युवक काँग्रेसच्या दिवसांपासून त्यांच्यासोबत राहिलेले राजकीय नेते आणि कार्यकर्ते हेच सांगतात. हे सरकार आल्यापासून कोकाटे मंत्रिमंडळात आहेत. याचं कारण यावेळच्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी आपला मतदारसंघ त्यांच्या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना देऊ केला म्हणून. पवार यांनी या निवडणुकीत पारंपरिक बारामती मतदारसंघाऐवजी ज्या मतदारसंघांचा विचार केला होता, त्यात अहिल्यानगर जिल्ह्यातील काही मतदारसंघांबरोबरच नाशिक जिल्ह्यातील सिन्नर विधानसभा मतदारसंघाचाही समावेश होता. सिन्नरची हवा जोखण्यासाठी त्यांनी या मतदारसंघात त्यावेळी लागोपाठ दौरेही केले होते. पवार यांच्या त्या मनसुब्याचे कोकाटे यांनी स्वागतच केलं होतं. आपल्या हातातला मतदारसंघ पवार यांच्यासाठी सोडण्याची बिनशर्त तयारी दाखवल्याने साहजिकच कोकाटे यांच्या गुणांत वाढ झाली. त्यातूनच त्यांचा मंत्रिमंडळ प्रवेश नक्की झाला!

जे मनात असेल ते बोलून टाकण्यात कोकाटे मागेपुढे पाहात नाहीत. राजकारणात हा गुण बहुधा अडचणीचाच ठरतो. त्यामुळे, मंत्रिमंडळात आल्यानंतरही कोकाटे यांनी आपल्या पूर्वीच्याच लौकिकात अधिक भर टाकण्यास सुरुवात केल्यानंतर ते चांगलेच अडचणीत आले. त्यासाठी त्यांना पक्षप्रमुखांकडून खडे बोलही ऐकावे लागले. मुख्यमंत्र्यांनी उघड नाराजी व्यक्त करून झाली. पण म्हणतात ना, 'मारणाऱ्याचा हात धरता येतो, बोलणाऱ्याचं तोंड कसं धरणार?' अगदी तशीच गत कोकाटे यांच्याबाबतीत झाली. 'शेतकरी भिकारी नाही. मला तसं म्हणायचं नव्हतं. माझ्या विधानाचा विपर्यास झाला' असा खुलासा करताना कोकाटे यांनी 'शेतकरी कसला भिकारी? सरकार भिकारी' असा खुलासा करून स्वतःलाच आगीतून फुफाट्यात नेऊन टाकलं'! त्याचा धुरळा खाली बसत नाही तोवर हे पत्त्यांचं प्रकरण समोर आलं. त्यातही खुलासा करताना 'बुडत्याचा पाय खोलात' अशीच गत झाली. 'मोबाइल सुरू करताना रमीचा डाव 'पॉप-अप' झाला' या त्यांच्या खुलाशानंतर विधिमंडळाने केलेल्या तपासात त्यांच्या मोबाइलवर रमीचा डाव किती वेळ चालला होता इथपासून त्यांच्या या क्रीडानंदाचे चित्रीकरण कुठून केलं गेलं? इथपर्यंत सगळ्याच बाबी उघड झाल्या. यावेळीही केवळ तेच अडचणीत आले नाहीत. त्यांच्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, प्रवक्ते, पवार - असे सगळेच अडचणीत आले. त्या सगळ्यांनीच अगदी कठोर प्रतिक्रिया दिल्या. त्यावरून 'कोकाटे यांची गच्छंती नक्की' अशा प्रकारच्या बातम्याही काही अतिउत्साही माध्यमांनी चालवल्या. पण, तसं घडणं अवघड होतं. कारण, त्याचवेळी अन्यही काही मंत्र्यांच्या तशाच वादग्रस्त बाबी सुरू होत्या. त्यांच्यावर शिस्तभंगाची किंवा औचित्यभंगाची कारवाई होण्याची चिन्हं नव्हती. जर त्यांच्यावर कारवाई नाही, तर एकट्या कोकाटेंवरच कारवाई कशी होणार? राजकारणातली गणितं आणि समीकरणं अशीच वेगळी असतात. त्यामुळे, कोकाटे वाचले. केवळ खाते बदलावर, शिक्षा म्हणून कमी महत्त्वाचं खातं स्वीकारून कोकाटेंनी स्वतःची मान सोडवून घेतली, असंच चित्र बाहेर आहे.

कोकाटे यांचं विधिमंडळाच्या सभागृहातलं गैरवर्तन केवळ रमी खेळण्याचं आहे, की सभागृहात मोबाइल वापरण्याचं आहे? सदस्यांच्या सभागृहातल्या हालचालींचं अशा प्रकारे चित्रण करणं गंभीर नाही का? या मुद्द्यांचा ऊहापोह अजूनतरी कुठे नीट झालेला दिसत नाही. विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासह विधिमंडळ प्रशासन आणि सभागृहांनाही याचा विचार करावा लागेल. सभागृहाचे संकेत, परंपरांचं उल्लंघन होत असल्याच्या तक्रारी खुद्द सभागृहात सुरू असतातच. त्यात सभागृहाच्या शिस्तीचा, सभागृहातील वर्तनाचा मुद्दाही विचारात घ्यावा लागणार आहे. सदस्यांनी; अनेकदा मंत्र्यांनीही एकमेकांना दिलेले 'तोंडात गुळणी धरण्याचे पदार्थ' वाहिन्यांच्या पडद्यावर दिसत असतात. सभागृहात असताना सदस्यांनी मोबाइलचा वापर करणं, काहीतरी चघळत राहाणं, प्रेक्षक सज्जातून प्रेक्षकांनी चित्रीकरण करणं, विविध गॅलऱ्यांत सुरू असलेल्या 'फ्री स्टाईल' हालचाली - या सगळ्या बाबी विधिमंडळाचं गांभीर्य घालवणाऱ्या आहेत. फार पूर्वी याबाबत पिठासीन अधिकारीच अत्यंत कडक आणि आग्रही असत. पिठासीन अधिकाऱ्यांच्या या पावित्र्यामुळे विधान भवनाची सुरक्षा यंत्रणाही अत्यंत सजग असे. प्रेक्षक सज्जातील एखादा प्रेक्षक खुर्चीत पायावर पाय टाकून बसला, वार्ताहर गॅलरीतला एखादा वार्ताहर सभागृहात बोलणारा सदस्य कोण आहे, हे पाहण्यासाठी आपल्या बाकावरून वाकला, तरी सुरक्षा रक्षकाकडून त्याला जागीच ताकद दिली जात असे. गॅलरी प्रवेशिका असूनही संकेतभंग करणाऱ्यांना सुरक्षा रक्षकांनी अनेकदा गॅलऱ्यांतून बाहेर काढलेलं आहे! विधिमंडळाची प्रतिष्ठा कायम राखण्यासाठी अशा प्रकारचा आग्रह असायला हवा. तशी शिस्त लावायला हवी. ती असेल, तर कोणाचीच विधिमंडळात बसून कोणतंही आक्षेपार्ह वर्तन करण्याची हिंमत होणार नाही.

## कुटुंबव्यवस्था ढासळल्यामुळे समाजव्यवस्था विस्कळीत



एकत्र कुटुंबात राहायचे म्हटले, तर बंधने आलीत, कर्तव्य-पालन आलं, शिस्त आली, जबाबदारी आली अन् कुटुंबाला अभिप्रेत असलेली मिळून-मिसळून-सर्वांशी जुळवून घेऊन वागण्याची स्वभावप्रवृत्ती आली. आज अशी बंधनं माणसाला नको आहेत.

आपण सातत्याने म्हणतो सामाजिक वातावरण बदलले आहे, परिस्थिती पहिल्यासारखी राहिली नाही, लोकं बदलली, स्वभाव बदलले, माणसांमध्ये नीतिमत्ता, मूल्य राहिली नाहीत, खरेपणा उरला नाही. खरंतर समाज हा अनेक कुटुंबाचा समूह असतो. अनेक प्रकारची, अनेक जाती, धर्म, पंताची कुटुंब एकत्र येऊन एका ठिकाणी वास्तव्य करतात तेव्हा समाज तयार होतो. कोणत्याही गोष्टीची मग ती चांगली असो वा वाईट सुरुवात ही कुटुंबापासून होते. हे कुटुंब म्हणजेच घर मग ते अगदी एक-दोन माणसाचं असो वा वीस-तीस जणांचं असो, त्यातलं वातावरण, संस्कार, त्यातल्या लोकांची वागणूक, स्वभाव, त्यांची कृत्य हेच समाजावर प्रभाव टाकत असतात. या ठिकाणी आपण एक उदाहरणं घेऊ. एका चार- पाच लोकांच्या कुटुंबातील लोकं वेगवेगळ्या स्वरूपाची कामं करतात. जसे की एक जण शाळेत शिक्षक आहे तो मुलांना ज्ञान देतो. एक जण पुजारी आहे तो लोकांना मंदिरात पूजेला सहकार्य करतो, त्यांना पुण्य कमवायला हातभार लावतो. त्याच कुटुंबातील एकजण किराणा दुकान चालवतो. लोकांना जीवनावश्यक गोष्टी पुरवून स्वतःचा उदरनिर्वाह करतो. एकजण भाजीपाला विकतो आणि ग्राहकाला रोज ताजी भाजी पुरवतो आणि शेतकऱ्यांना पोट भरायला मदत करतो. म्हणजेच या कुटुंबातील प्रत्येकजण समाजासाठी काहीना काही योगदान चांगल्या मार्गाने देतात आणि स्वतः पण अर्थार्जन करतात. या उलट दुसऱ्या एका कुटुंबात दोन-तीन लोकं असून त्यातील एक जण दररोज लोकांना लुबाडणे, चोऱ्या करणे यासारखे कामं करतो, त्याच घरातील दुसरा व्यक्ती हा चोरून आणलेला माल विल्हेवाट लावतो आणि तिसरा या दोघांच्या चोऱ्या चुकीचा धंदा समाजापासून लपवून ठेवण्यासाठी वेगवेगळ्या क्लृप्त्या करत असतो. लोकांना वेगवेगळी कारणं देऊन समाजाची दिशाभूल करत असतो.

आता आपण राहत असलेल्या समाजात दोन प्रकारची कुटुंब आहेत जे समाजात चांगल्या वाईट गोष्टी घडायला किंवा घडवायला कारणीभूत ठरत आहेत. एखादा सभ्य सुसंस्कृत साधा माणूस जर चोर भामट्याकडून लुबाडला गेला तर तो नशिबाचा भाग म्हणून जे गेलं ते सोडून देईल. एखादा सुशिक्षित असेल तर तो कायदेशीर मार्गाने जाऊन ते परत मिळवण्यासाठी प्रयत्न करेल. एखादा अर्धवट किंवा विकृत मनोवृत्तीचा असेल तर तो त्या चोराला शोधून मारहाण करेल, त्याला जीवे मारेल, शिवीगाळ करेल थोडक्यात तो हिंसाचार मार्ग अवलंबून न्याय मिळवण्यासाठी प्रयत्न करेल. म्हणजेच याठिकाणी दोन कुटुंबात वितुष्ठ आलं, दुश्मनी आली, भांडण आलं आणि दोन कुटुंबातील हा वाद त्यांच्या पुरता न राहता आता सामाजिक विषय बनला आहे. अशाप्रकारे छोट्या छोट्या गोष्टी ज्या घरोघरी घडतात त्याच समाजावर छाप टाकत असतात आणि कुटुंबांना धाक न राहिल्यामुळे, मर्यादा न राहिल्यामुळे घरातील गोष्टी बाहेर येऊन त्याचं बाजारीकरण होऊ लागलं आहे आणि समाजात हे विष पसरू लागलं आहे. एकत्र कुटुंब पद्धती संपवून छोटी छोटी कुटुंब तयार होत चालल्यामुळे एकमेकांना सामावून घेणे, समजावून घेणे, सांभाळून घेणे होत नाही. मनातल्या गोष्टी घरात बोलल्या जात नाहीत तर त्या घराबाहेरील लोकांकडे व्यक्त केल्या जातात. ज्यांच्याकडे त्या व्यक्त होतात ते जर तितकेच योग्य विचारसरणीचे नसतील तर आपल्याला दिशाहीन करतात आणि आयुष्य भरकटले जाते. असे घरोघरी प्रत्येकासोबत होत असल्यामुळे समाजच चुकीच्या दिशेने वाहत जातो.

अजून एक उदाहरणं म्हणजे जेव्हा कोणत्याही घरातील पती अथवा पत्नी विवाहबाह्य संबंध ठेवते तेव्हा ती किंवा तो दुसऱ्या कुटुंबाला म्हणजेच कोणाच्या तरी पतीला अथवा पत्नीला त्रासदायक ठरत असते, कोणाचे तरी घर संसार मोडत असते. म्हणजेच एका कुटुंबातील व्यक्तीमुळे दुसऱ्या कुटुंबातील व्यक्तीला त्रास होत असतो. पर्यायाने दोन्ही कुटुंबातील लोकांना त्रास होऊन समाजाचे हे घटक भविष्यात. कोणत्याही भयानक परिणामांचे बळी ठरू शकतात. आता ज्याची पत्नी किंवा जिचा पती विवाहबाह्य संबंध ठेवतोय ती व्यक्ती पण विचार करते आपण सुद्धा असे करायला काय हरकत आहे? आपण का एकटं राहायचं? आपण का अन्याय सहन करायचा आणि आपलं मन मारून जगायचं? मग ती व्यक्ती पण कुठे न कुठे स्वतःला गुंतवते, स्वतःसाठी कोणीतरी शोधते आणि अजून एक कुटुंब डिस्टर्ब होते. असं होतं होत ही विवाहबाह्य संबंधाची साखळी कधी संपत नाही आणि समाजात अनैतिक संबंध फोफावले जातात. अशावेळी आपण म्हणतो आजकाल समाजात विवाहबाह्य संबंध खूप वाढले आहेत पण त्याची सुरुवात कुटुंबापासूनच झाली हे लक्षात घेणे आवश्यक आहे.जेव्हा कोणतीही घटना आपल्या घराबाहेर जाते तेव्हा ती सामाजिक विषय बनते आणि समाज रचना बिघडते. म्हणूनच आपण म्हणतो घराबाहेर काही जायला नको. त्यामुळे इज्जत जाते, बदनामी होते, लोकं आपल्याबद्दल चुकीचं बोलतात, आपला अप प्रचार होतो. हे जर टाळायचं असेल तर कुटुंबाला शिस्त असणं, संस्कार असणं खूप महत्वाचे आहे.

## आठवड्यातून दोनदा कोरफडीच्या वाफेचा वापर करून चमकदार आणि चमकदार त्वचा मिळवा

**कोरफडीची वाफ कशी वापरावी? :**

**साहित्य तयार करणे :** १. एका भांड्यात पुरेसे पाणी घ्या आणि ते गरम करा. २. पाणी उकळू लागले की त्यात १-२ चमचे ताजे किंवा बाजारातून विकत घेतलेले अ‍ॅलोवेरा जेल घाला. ३. पाणी थोडे थंड होऊ द्या जेणेकरून वाफ आत घेण्यास कोणतीही अडचण येणार नाही. त्वचेच्या अनेक समस्यांवर पनीरचे पाणी वापरा, जाणून घ्या वापरण्याची पद्धत वाफ कशी घ्यावी: १. एक टॉवेल घ्या आणि तुमचे डोके झाका आणि तुमचा चेहरा वाफेजवळ आणा. २. वाफ घेताना, खूप जवळ जाऊ नका, अन्यथा त्वचा जळू शकते. ३. ५-१०मिनिटे हळूहळू वाफ घ्या. ४. वाफ घेतल्यानंतर, स्वच्छ टॉवेलने चेहरा हळूवारपणे पुसून टाका. ५. यानंतर चेहऱ्यावर हलके मॉइश्चरायझर किंवा कोरफडीचे जेल लावा. १. चमकणारी त्वचा कोरफडीमध्ये असलेले जीवनसत्त्वे आणि अँटीऑक्सिडंट्स त्वचेत खोलवर पोहोचतात आणि तिला पोषण देतात. गरम पाण्याची वाफ घेतल्याने छिद्रे उघडतात आणि कोरफडीचे गुणधर्म त्वचेत सहजपणे शोषले जातात, ज्यामुळे त्वचेला नैसर्गिक चमक येते. २. ब्लॅकहेड्स आणि व्हाइटहेड्स काढून टाकणे वाफ घेतल्याने त्वचेचे छिद्र उघडतात आणि घाण, तेल आणि ब्लॅकहेड्स सहज निघून जातात. कोरफड वेरा जेल अँटीबॅक्टेरियल पद्धतीने काम करते. ३. मुरुमांवर उपचार करते

कोरफडीतील दाहक-विरोधी गुणधर्म मुरुमे कमी करण्यास आणि नवीन मुरुमे तयार होण्यापासून रोखण्यास मदत करतात. वाफेमुळे त्वचा खोलवर स्वच्छ होते आणि तेलाचे उत्पादन संतुलित होण्यास मदत होते.

४. कोरड्या आणि निस्तेज त्वचेला मॉइश्चरायझ करते. वाफ घेतल्याने त्वचेत ओलावा टिकून राहण्यास मदत होते, तर कोरफडीच्या जेलचे हायड्रेटिंग गुणधर्म त्वचेला खोलवर मॉइश्चरायझ करतात.

५. वृद्धत्वाची लक्षणे कमी होणे

कोरफडीच्या जेलमध्ये असलेले व्हिटॅमिन ई आणि सी त्वचेला मुक्त रॅडिकल्समुळे होणाऱ्या नुकसानापासून वाचवतात, ज्यामुळे सुरकुत्या आणि फाइन लाइंसची समस्या कमी होते.

## ३० दिवस सतत केळी खा, तुम्हाला मिळतील हे ३ आश्चर्यकारक आरोग्य फायदे!



केळी, एक असे फळ जे केवळ चविष्टच नाही तर आरोग्यासाठी खूप फायदेशीर देखील आहे. हे फळ जीवनसत्त्वे, खनिजे आणि फायबरने समृद्ध आहे जे आपल्या शरीराला अनेक प्रकारे फायदेशीर ठरते.

**१. पचन सुधारते:** केळीमध्ये असलेले फायबर पचन सुधारते. हे बद्धकोष्ठतेपासून आराम देते आणि पचनसंस्था निरोगी ठेवते.

**२. अ‍ॅसिडिटीपासून आराम:** केळीमध्ये असलेले पोटॅशियम अ‍ॅसिडिटी कमी करण्यास मदत करते. हे पोटातील आम्ल उत्पादन नियंत्रित करते आणि गॅस, अपचन आणि छातीत जळजळ यापासून आराम देते.

**३. आतड्यांचे आरोग्य सुधारते:** केळीमध्ये असलेले प्रीबायोटिक्स आतड्यांमध्ये चांगल्या बॅक्टेरियाच्या वाढीस प्रोत्साहन देतात. हे पचन सुधारण्यास आणि आतडे निरोगी ठेवण्यास मदत करतात.

**१. हृदयरोग:** केळीमध्ये पोटॅशियमचे प्रमाण जास्त असते जे रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करते. त्यामुळे हृदयरोगाचा धोका कमी होतो.


**२. अशक्तपणा:** केळीमध्ये लोह असते जे अशक्तपणा रोखण्यास मदत करते.

**३. मधुमेह:** केळीमध्ये असलेले फायबर रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करते. यामुळे टाइप २ मधुमेहाचा धोका कमी होतो.

**४. कर्करोग:** काही अभ्यासातून असे दिसून आले आहे की केळीमध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स कर्करोगाच्या पेशींच्या वाढीस प्रतिबंध करण्यास मदत करतात.

तुम्ही दररोज सकाळी नाश्त्यात एक केळी खाऊ शकता. तुम्ही ते स्नॅक म्हणून देखील खाऊ शकता. तुम्ही सॅलड, स्मूदी किंवा इतर पदार्थांमध्ये केळी देखील घालू शकता. केळी हे एक असे फळ आहे जे आपल्या आरोग्यासाठी अनेक प्रकारे फायदेशीर आहे. ३० दिवस दररोज केळी खाल्ल्याने तुमचे पोटाचे आरोग्य सुधारू शकते आणि अनेक धोकादायक आजार टाळता येतात.

## एक प्रवास आत्मविश्वासाचा




खूप दिवस लिहिण्याचे मनात होते पण काही केल्या लेखणी कागदावर उतरतच नव्हती. गेल्या ३५ वर्षांचा कॅन्सरच्या क्षेत्रातील माझाही प्रवास इतका मला अनुभव संपन्न करून गेला. हे मी जेव्हा मागे वळून पाहते तेव्हा लक्षात येते एवढ्या वर्षांत ज्या भारतभरातील तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचता आले त्याचे श्रेय मी ज्या संस्थेत कार्यरत आहे त्या माझ्या कॅन्सर पेशन्ट एड असोसिएशनला देते. माझ्या संस्थेद्वारे मी देशातील विविध प्रकारच्या लोकांच्या संपर्कात येऊन त्यांच्याशी संपर्क सांधण्याचे भाग्य मला मिळाले आणि त्यांच्यामुळेच मला थोडा फार जीवनाचा अर्थ समजला. याचा उपयोग मला लोकांशी तसेच माझ्या पेशन्टबरोबर वागताना झाला. त्याचाशी त्यांच्या त्रासाबद्दल बोलताना त्यांचे दुःख मला माझेही वाटू लागले त्यामुळे त्यांना जास्तीत जास्त मदत कशी मिळेल याचा सतत विचार माझ्या मनात येत राहिला आणि त्यानुसार माझे प्रयन्त राहिले. जेव्हा संस्थेत पाऊल ठेवले तेव्हाच दृढ निश्चय केला की, जे काम मला दिले जाईल ते प्रामाणिकपणे करीन आणि त्याला न्याय देईन.

कर्करोगाचे सर्वांगीण व्यवस्थापन कॅन्सर पेशन्ट एड असोसिएशनद्वारे गेली ५५ वर्षे होत आहे. त्यामध्ये जनजागृती, पूर्वप्राथमिक चिकित्सा ते कर्करोगाच्या आजारातून बरे होत असलेल्या रूग्णांचे पुनर्वसन करून त्यांना स्वावलंबी करण्यापर्यंत सर्व प्रकारची मदत संस्थेच्या माध्यमातून केली जाते. १९६९ पासून कॅन्सरग्रस्थांना मदत देण्याच्या उद्देशाने सुरू झालेले सी.पी.ए.चे कार्य आज विविध स्थरावर होत आहे, त्यातील पुनर्वसन व प्रतिबंधात्मक उपाय या महत्त्वाच्या बाबींचा विचार करून जनजागृती व पूर्वप्राथमिक चिकित्सा यावर काम केले आहे आणि त्या माध्यमातून आमचा भारतभर प्रवास होत आहे. जी प्रिंसिपल्स, जे संस्कार माझ्या आई-वडिलांनी आणि माझ्या पतीच्या पाठिंब्यामुळे आणि त्याचबरोबर ज्या पुस्तकांनी मला समृद्ध केले त्याचा मी माझ्या वैयक्तिक जीवनात पुरेपूर वापर केला. तसेच कॅन्सर पेशन्ट एड असोसिएशनचे चेअरमन वा. के. सप्रू आणि सध्या संस्थेचा कार्यभार सांभाळणाऱ्या श्रीमती अल्का बीसेन यांच्या सहकार्यामुळे मी आज हे काम समाजासाठी करू शकले.

कर्करोग पीडित हा शब्द कानावर पडला तरी आपल्या नजरेमध्ये किंवा चेहऱ्यावर दयेचा भाव निर्माण होतो. असे वाटते की, ही व्यक्ती याला कशी सामोरे जाणार किंवा ही व्यक्ती आता थोड्याच दिवसाची सोबती आहे, पण ह्या व्यक्तींना किंवा स्त्रियांना तुमच्या दयेची किंवा सहानुभूतेची गरज नसते. तर तुमचा मदतीचा हात हा त्यांना त्यांच्या या कष्टमय प्रवासात एक फार मोठा आधार बनू शकतो आणि त्यांचा पुढील प्रवास सुखकर होऊ शकतो. कर्करोगग्रस्थ रुग्ण हा मानसिक, शारीरिक आणि आर्थिक अडचणीत सापडलेला आढळतो. या त्याच्या अडचणीच्या काळात त्याला नेहमीच मदतीची गरज असते. मग ती मानसिक असो किंवा आर्थिक यासाठी कॅन्सर पेशंट एड असोसिएशन नेहमीच पेशंटची गरज लक्षात घेऊन मदतीचा हात पुरवीत असते. जेव्हा ते संस्थेमध्ये येतात त्यावेळेला त्यांच्याकडे पाहताना त्यांचे मानसिक व शारीरिक खच्चीकरण झालेले आढळते. पण समुपदेशानंतर तर त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला जातो त्यांचा विश्वास संपादन केल्यानंतर तो रुग्ण व त्याचे नातेवाईक पुढील गोष्टींबद्दल दिशा मिळाल्यामुळे खूपच सकारात्मक दृष्टिकोनाने आजाराकडे पाहू लागतात आणि उत्तमपणे त्याला सामोरे जातात. आतापर्यंत जवळजवळ ३,८५,००० लोकांचा तपास केला गेला आहे. सध्या स्त्रियांमध्ये कर्करोगाचे प्रमाण जास्त दिसत आहे. विशेषतः स्तनाचा कर्करोग व गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग याचे प्रमाण वाढले आहे. या धर्तीवर संस्थेच्या माध्यमातून निरनिराळ्या कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे व त्यांच्या निर्मूलनासाठी अभ्यासही केला जात आहे. हे कार्य संस्थेच्या इतर शाखांमध्ये म्हणजे दिल्ली व पुणे येथूनही तेवढ्याच जोमाने केले जात आहे. संस्थेमार्फत मी सगळ्यांना हेच सांगू इच्छिते की, कॅन्सर म्हणजे कॅन्सल नाही तर वेळीच या आजाराचे निदान झाले तर ती व्यक्ती किंवा स्त्री अतिशय चांगल्या पद्धतीने आपले पुढील आयुष्य चांगल्या रीतीने व्यतीत करू शकते. माझे सर्वांना एवढेच सांगणे राहील की, स्वतःवर प्रेम करा, स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्या, तुम्ही तुमच्या घराचा कणा आहात.तुमचे आरोग्य हे तुमच्या कुटुंबाच्या एकूण जडणघडणीत खूप महत्त्वाची भूमिका पार पाडत असते. तेव्हा माझी तुम्हाला कळकळीची विनंती आहे की, कुठल्याही व्यसनांपासून दूर राहा आणि नियमित स्वतःची शारीरिक तपासणी करून घ्या. व्यायाम आणि उत्तम आहार यांचा समावेश रोजच्या जीवनशैलीत करा आणि त्यातून काही त्रास असेल तर वेळीच त्यावर उपचार करा. त्यामुळे अतिशय चांगले आणि व सुंदर जीवन व्यतीत करण्यास तुम्हाला मदत होईल.

**-नीता मोरे**

## सुखाची व्याख्या

**'मला सांगा सुख म्हणजे नक्की काय असतं,**
**काय पुण्य असतं की जे,**
**घरबसल्या मिळतं..'**

या ओळी कानावर पडल्या आणि खुदकन हसू फुटलं. मनात विचारही सुरू झाले की, सुख मिळवण्यासाठी पुण्य करावं लागतं की, पुण्य कमाविण्यासाठी सुखी असल्यासारखं राहावं लागतं? याचं कोडं पडू लागतं.

आपलं काय असतं ना, नकारात्मक गोष्टी माणूस लवकर समजून उमजून त्यांना आपलंसं करतं. पण कुणी सकारात्मक सांगायला आला की, त्याला देखील आणि नकारात्मक भावनेनेच बघतो. कारण आपल्याला आयुष्यात कुठेतरी अपयश आलेले असते आणि नकारात्मकता वाढत जाते. पण शाळेत शिकवलेले आपण सपशेल विसरून जातो की, अपयश ही यशाची पहिली पायरी आहे. कारण अपयश आले नाही, तर यशाची किंमत कळणार कशी? सुख देखील असेच असते. आयुष्यात दुःख मिळाले नाही, तर सुखाची किंमत कशी कळणार?

आता प्रत्येकाची सुखाची व्याख्या वेगळी असते. कोणी मोठा बंगला असूनदेखील सुखी नसतो, तर कुणी छोट्या झोपडीत राहूनदेखील सुखी असतो. याच्यामुळे सुख नक्की काय असतं, असा प्रश्न पडतो. खरं म्हणजे सुख हे आपल्याला देवाने दिलेले मोठे वरदान आहे. पण, आपण ते समजून घेत नाही. किंबहुना आपण दुःख जास्त कवटाळतो. म्हणजे आपणाकडे नाही त्याची कारणे शोधत आपण मनाला दुःखी करतो. जे आपल्याकडे आहे त्यात उपभोग न घेता सुख गमावतो.

सुख मानणं इतकं कठीणदेखील नसतं. माणसाने समाधानी असणे महत्त्वाचे. आजकाल गरजा वाढत आहेत आणि त्या पूर्ण करण्यासाठी माणसाला चोवीस तासदेखील कमी पडतात. पण, त्यातही काही क्षण असतात जे त्याने शोधले, तर क्षणभर का होईना मनाला विश्रांती देऊन ते शांतीचे क्षण सुखाने परिवारासोबत अनुभवू शकतात.जेव्हा आपण सकारात्मक विचार करतो, तेव्हा आपले मन शांत होते आणि नसलेल्या गोष्टींपेक्षा असलेल्या गोष्टींचा विचार करू लागते. मग समजते, आपल्याकडे तर भरपूर काही आहे आणि आपण विनाकारण धावत्या गोष्टींमागे पळत होतो. सुखी माणसाचे लक्षण समाधानी असते आणि समाधानी असण्याचे उदाहरण म्हणजे, माणसाला शांत झोप लागणे. हे झोप



लागणे एवढे कठीणदेखील नाही, पण विचारांनी ही झोपही जाते. चला तर मग, 'सुख पाहता जवापाडे, दुःख पर्वताएवढे' ही म्हण बदलण्याचा प्रयत्न करू. आहे ते आयुष्यातील सुख उपभोगण्याचा प्रयत्न करून, दुःखाला दूर पळवून लावू.

# विशेष वृत्त

## बीड-अहिल्यानगर रेल्वे सुरू करण्याची मागणी

**बीड :** बीड-अहिल्यानगर या रेल्वे मार्गाचे विद्युतीकरणाचे काम पुर्णत्वास येत असून बीड अहिल्यानगर या मार्गावरती प्रवासी रेल्वे चालू करावी अशी मागणी बीड जिल्हा स्वातंत्र्य सैनिक रेल्वे कृती समितीच्या बैठकीत करण्यात आली. जिल्हा स्वातंत्र्य सैनिक रेल्वे कृती समितीचे ज्येष्ठ सदस्य सत्यनारायण लाहोटी यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या निवासस्थानी गुरुवारी कृती समितीची बैठक झाली. अहिल्यानगर बीड परळी या मार्गावरील रेल्वेच्या कामाच्या संदर्भात तसेच विद्युतीकरणाच्या कामासंदर्भात चर्चा करण्यात आली. समितीच्या अध्यक्षांनी या मार्गावरील कामाच्या संदर्भातील आढावा या बैठकीत मांडला. रेल्वेच्या अहिल्यानगर-बीड-परळी मार्गावरील अडचणी संदर्भात चर्चा करण्यात आली. तसेच धाराशिव, बीड, छत्रपती संभाजीनगर या मार्गावरील रेल्वे कामाच्या सर्वे संदर्भात चर्चा करण्यात आली. बीड-मुंबई या मार्गावर रेल्वेचे विद्युतीकरणाचे काम पुर्ण होत असल्याने बीड-मुंबई ही प्रवाशी रेल्वे सुरू करण्यात यावी या संदर्भातले निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात येणार असून या संदर्भात बीडचे खासदार बजरंग सोनवणे, आणि धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांना देखील या संदर्भात निवेदन देण्याचे ठरले. या बैठकीला रेल्वे कृती समितीचे अध्यक्ष जवाहरलाल सारडा, सुनिल क्षीरसागर, सुरेश मेखे, विलास बडगे अरूण डाके, प्रा. अरूण भस्मे, मनोहरअप्पा शेटे, सुरेश नटवरलाल बुध्ददेव, लईक अहेमद, शिवाजी जाधव, व इतर सदस्य उपस्थित होते.

## संत सोपान काका महाराज मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**परळी:** येथील श्री संत गुरुवर्य सोपान काका महाराज मंदिरात दि. १३ ऑगस्ट पासून अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त १३ ते २० ऑगस्ट या सात दिवस चालणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यानिमित्त दररोज रात्री आठ ते दहा या दरम्यान कीर्तनांचे आयोजित करण्यात आले आहे. दि.१३ ऑगस्ट रोजी पहिली कीर्तन सेवा वेदांताचार्य सागर महाराज उखळीकर, १४ ऑगस्ट रोजी भागवताचार्य आदिनाथ महाराज फपाळ, १५ रोजी भागवताचार्य ज्ञानेश्वर महाराज उखळीकर, १६ रोजी मारुती महाराज लातूरकर, १७ रोजी बापूसाहेब महाराज गोजरे, दि. १८ रोजी भागवताचार्य विनायक महाराज शिंदे, १९ रोजी भागवताचार्य वासुदेवानंद महाराज टाकळीकर, दि. २० रोजी विठ्ठल महाराज उखळीकर यांचे सकाळी दहा ते दुपारी बारा काल्याचे कीर्तन होईल व नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. कीर्तन सेवेबरोबरच सात दिवस दररोज पहाटे काकडा भजन, विष्णुसहस्त्रनाम, ज्ञानेश्वरी पारायण, रामायण, प्रवचन, धुपारती आणि रात्री जागर असे विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ज्ञानेश्वरी पारायण नेतृत्व माधव महाराज उखळीकर, चैतन्य महाराज उखळीकर तर गाथा भजन नेतृत्व सत्यनारायण महाराज मुरकुटे व फळावरील सर्व गुणीजण भजनी मंडळी हे उपस्थित राहणार आहेत. परळी पंचक्रोशीतील भाविकांनी या सर्व अखंड हरिनाम सप्ताहातील कीर्तन महोत्सव जागर भजन आधी धार्मिक कार्यक्रमाचा आनंद घ्यावा अशी आवाहन संत सोपान काका महाराज भजनी फड, केशव महाराज उखळीकर, विठ्ठल महाराज उखळीकर विश्वंभर महाराज उखळीकर व दीनानाथ महाराज उखळीकर तसेच समस्त उखळीकर महाराज मंडळी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## मोहम्मद रफी यांच्या गीतांनी रसिक मंत्रमुग्ध

**बीड :** चित्रपटसृष्टीतील सुरांचे बादशहा तानसेन म्हणून जगभरात ज्यांचे नाव आदराने घेतले जाते, ज्यांच्या गायन कले समोर रसिक श्रोते नतमस्तक होतात, असे दिवंगत पार्श्वगायक मोहम्मद रफी यांच्या पुण्यतिथी निमित्ताने गायक एम. एम.शेख यांनी दरवर्षीप्रमाणे यावेळीही घेतलेल्या एक शाम मोहम्मद रफी के नाम या कार्यक्रमात संगीतप्रेमींचा महापूर लोटला. मंत्रमुग्ध झालेल्या रसिक श्रोत्यांनी दालन ओसंडून वाहिले. गायक एम.एम.शेख यांनी जिल्हाभरातील इतर गायक- गायिकांना सोबत घेत गायकांचा एक संच तयार केला आहे. हे सर्वजण मिळून अजरामर पार्श्वगायक मोहम्मद रफी यांच्या पुण्यतिथी निमित्ताने दरवर्षी ३१ जुलै रोजी एक शाम मोहम्मद रफी के नाम हा कार्यक्रम विनामूल्य आयोजित करतात. या कार्यक्रमाची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत चालली आहे. यावेळी जालना रोड वरील संग्राम हॉटेल च्या दालनात घेण्यात आलेल्या कार्यक्रमास फक्त बीड शहरच नाही तर जिल्हाभरातून तसेच शेजारील जालना जिल्ह्यातून रसिक श्रोते खास कार्यक्रमासाठी आले होते.

## माजलगाव येथे संविधान जागर कार्यक्रमाचे आयोजन

**माजलगाव :** येथील माजलगाव विकास प्रतिष्ठान वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबवत असते. याचाच एक भाग म्हणून 'संविधान जागर संविधानच का हवे? मनुस्मृती नको, संविधान हवे' या विषयावर आधारित एक दिवसीय विचार मंथन चर्चासत्र रविवार दि. ३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता सुंदरराव सोळंके महाविद्यालयात आयोजित केले जाणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन माजलगाव विकास प्रतिष्ठान आणि महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. भारतीय संविधानाचे महत्त्व तसेच त्यातील मूलभूत तत्त्वे यांची जनतेमध्ये जाणीव निर्माण करणे हा या प्रकारच्या कार्यक्रमांचा मुख्य हेतू असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड पल्लवी सोळंके उपस्थित राहणार आहेत. या चर्चासत्रात संध्या गोखले, संध्या म्हात्रे, सुजाता गोठोसकर, सुनीता बागल आणि डॉ. सविता शेटे यांसारख्या प्रतिष्ठित व्यक्ती सहभागी होणार आहेत. धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही प्रधान समाज निर्मितीसाठी संविधान हे आपल्या जगण्याचा एक भाग झाले पाहिजे, असे आयोजकांनी सांगितले. या कार्यक्रमासाठी नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर सहभागाची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

## वाळ वाहतूक करणाऱ्या टिपरेची टेम्पोला धडक

**आष्टी :** टायर फुटल्याने अवैध वाळू वाहतूक करणारा भरधाव टिप्पर विरुद्ध दिशेने जाऊन एका टेम्पोवर जाऊन धडकल्याची घटना शुक्रवार (दि.१) रोजी सकाळी साडेसहाच्या दरम्यान बीड अहिल्यानगर राज्य महामार्गावरील सांगवी शिवारात घडली. सुदैवाने या अपघात कोणतीही जीवितहानी झाली नाही. अहिल्यानगर येथून पीव्हीसी पाईप घेऊन एक टेम्पो (क्र.एम.एच १६, ए.वाय. ३२२३) सकाळीबीडकडे रवाना झाला. तर याचवेळी डोईठाणहून धामणगावकडे अवैध वाळू वाहतूक करणारे टिप्पर भरधाव वेगात जात होता. सकाळी साडेसहाच्या दरम्यान बीड-अहिल्यानगर राज्य महामार्गावरील आष्टी तालुक्यातील सांगवी परिसरात टायर फुटल्याने टेम्पो अनियंत्रित होऊन विरुद्ध दिशेला जाऊन टेम्पोवर धडकला. या अपघातात दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने चालक किरकोळ जखमी झाले आहेत. माहिती मिळताच घटनास्थळी कडा पोलिस चौकीचे पो. ह. भाऊसाहेब आहेर, अमोल नवले, वाहन चालक प्रताप घोडके यांनी भेट दिली असून पंचनामा केला आहे.

# बीड जिल्हा बँकेच्या सभासदांनी एक रक्कमी कर्ज परत फेड योजनेचा लाभ दि.३० सप्टेंबर २०२५ पूर्वी घ्यावा: विवेक जॉन्सन अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी

**बीड (प्रतिनिधी):-** दि बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. बीड बँकेने लागु केलेल्या एक रक्कमी कर्ज परतफेड योजनेची अंतीम मुदत दि.३०.०९.२०२५ असून सदरील मुदतीनंतर ही योजना संपुष्टात येणार आहे. सदर योजनेत सहभाग नोंदविण्यासाठी आपण यापूर्वी रक्कमेचा भरणा करून भाग घेतला असल्यास आपण दि.३०.०९.२०२५ पर्यंत उर्वरीत रक्कमेचा भरणा करण्यात यावा. रक्कमेचा मुदतीत भरणा न झाल्यास आपण योजनेत सहभाग घेणेसाठी भरणा केलेली रक्कम आपल्या थकीत संस्थेच्या /थकबाकीदाराच्या थकीत व्याजात जमा करण्यात येवुन आपला एक रक्कमी कर्ज परतफेड योजने अंतर्गत योजनेतील सहभाग संपुष्टात येणार आहे.

तरी आपण आपल्या संस्थेकडील/ वैयक्तिक बँकेचे एक रक्कमी कर्ज परतफेड योजने अंतर्गत दि. ३०.०९.२०२५ पूर्वी भरणा करून घेवून बेबाकी घेण्यात यावे असे मा.प्राधिकृत अधिकारी समितीची सभा दि.३१.०७.२०२५ रोजीच्या सभेमध्ये जिल्ह्यातील सर्व थकबाकीदार संस्था/ सभासदांना श्री.विवेक जॉन्सन बँकेचे प्राधिकृत अधिकारी समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी बीड तसेच सतीश तोटावार प्राधिकृत अधिकारी समितीचे सदस्य तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड, सतीश पोकळे प्राधिकृत अधिकारी समितीचे सदस्य तथा जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-१ सहकारी संस्था बीड, अशोक कदम प्राधिकृत अधिकारी समितीचे सदस्य तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था बीड, ॲड.अशोक कवडे प्राधिकृत अधिकारी समितीचे सदस्य तथा जेष्ठ विधीज्ञ जिल्हा न्यायालय अंबाजोगाई व शरद ठोंबरे बँकेचे प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आवाहन केले आहे.

## रेड रिबन स्पर्धेत संस्कार विद्यालयाची राज्यस्तरावर निवड

**बीड (प्रतिनिधी):-** महाराष्ट्र शासन एडस निर्मूलन संस्था मुंबई मार्फत जिल्हास्तरीय रेड रिबन स्पर्धा जिल्हा रुग्णालयात संपन्न झाली. या स्पर्धेत संस्कार विद्यालय बीडने उज्ज्वल यश प्राप्त केले. समर्थ तावरे याने सर्वप्रथम क्रमांक प्राप्त केला असून त्याची थेट राज्यस्तरीय रेड रिबन स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तसेच आर्यन कुरे याने सर्वद्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे. जिल्ह्यातील विविध विद्यालयातील विद्यार्थ्यांनी लक्षणीय सहभाग नोंदवला होता. आणि यामध्ये संस्कार विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध करत लक्षणीय सुयश प्राप्त केले व थेट राज्यस्तरावर पुढील स्पर्धेसाठी आपले स्थान सुनील निश्चित केले. या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार डॉ. तांदळे, प्राचार्या सुवर्णा बेदरे, कार्यक्रम अधिकारी सुहास कुलकर्णी, फारोकी, उध्दव घाडगे यांनी केला. या विद्यार्थ्यांना विज्ञान शिक्षक शामसुंदर घाडगे यांनी मार्गदर्शन केले. यशस्वी विदयार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्कार प्रबोधिनीचे सचिव ड कालिदास थिगळे, उपाध्यक्ष भाऊसाहेब बोबडे, सर्व संचालक मंडळ मुअ राजेश राजहंस, पर्यवेक्षक रघुनाथ तावरे सह सर्व शिक्षक व शिक्षकेतर वृंदानी अभिनंदन केले.

## आरोग्य विभागातील ८३ कर्मचाऱ्यांना पदोन्नती मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांचे संघटनेतर्फे स्वागत

**बीड (प्रतिनिधी):** जिल्हा परिषद बीड अंतर्गत आरोग्य विभागातील ८३ कर्मचाऱ्यांच्या रखडलेल्या पदोन्नतीला अखेर मंजुरी मिळाली असून, हा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी जातीन रहमान (भा.प्र.से) आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ यांनी घेतला.

आरोग्य विभागातील विविध संवर्गातील कर्मचाऱ्यांना अनेक वर्षांपासून पदोन्नतीसाठी वाट पाहावी लागत होती. त्याबाबत महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद आरोग्य सेवा कर्मचारी संघटना, बीड यांच्यातर्फे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत होता. अखेर प्रशासनाने सकारात्मक निर्णय घेऊन अनेक कर्मचाऱ्यांचे पदोन्नती प्रलंबित प्रश्न मार्गी लावले. संघटनेचे जिल्हाध्यक्ष भरत नागरगोजे यांनी सांगितले की, 'हा निर्णय कर्मचाऱ्यांच्या न्याय हक्कांची जाणीव ठेवून घेतलेला आहे. यामुळे कर्मचाऱ्यांचे मनोबल उंचावले असून,



आरोग्यसेवेचे कार्य अधिक प्रेरणादायी आणि परिणामकारक होईल. 'संघटनेतर्फे जिल्हा आरोग्य प्रशासनाचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले असून, भविष्यातही अशाच पद्धतीने कर्मचारीहिताचे निर्णय घेत राहावेत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष भरत नागरगोजे कार्याध्यक्ष किशोर जाधव, सचिव साजिद शेख, संघटक संदिपान मांडवे, कोषाध्यक्ष मनोज वाघमारे, उपाध्यक्ष वसंत सानप, कैलास गर्जे, अनिरुद्ध सानप, महिला अध्यक्ष बेबी बेद्रे, उपाध्यक्ष ानीषा कदम हजर होते.

## प्रेमचंद : केवळ साहित्यिक नाही, तर सामाजिक जाणीवेचा शिल्पकार- प्रा. पाटील

**माजलगाव (प्रतिनिधी):-** भाशिप्र संस्थेच्या सिद्धेश्वर महाविद्यालय, जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय गढी, एकता शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला महाविद्यालय, बिडकीन (ता. पैठण) यांच्या संयुक्त विद्यमाने हिंदी विभागातर्फे 'प्रेमचंद जयंती समारोह' दि. ३१ जुलै २०२५ रोजी सकाळी ११ वाजता ऑनलाईन उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमास प्रमुख व्याख्यातेक म्हणुन गंगामाई महाविद्यालयाचे हिंदी विभागप्रमुख प्रो. डॉ. पंढरीनाथ शिवदास पाटील हे तर प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे, प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. नितीन आहेर हे उपस्थित होते. पुढे बोलताना प्रो. पंढरीनाथ शिवदास पाटील 'शिवांश', म्हणाले की प्रेमचंद यांच्या साहित्यिक कार्याचा सखोल वेध घेतला आणि त्यांच्या विचारांची आजच्या काळातील आवश्यकता विषद केली. मुंशी प्रेमचंद यांच्या साहित्याचं समग्र मूल्यमापन करण्यात आलं. प्रेमचंद यांना नव्या दृष्टिकोनातून समजून घेण्याची ही एक प्रेरणादायी संधी ठरली. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. नितीन आहेर म्हणाले की, प्रेमचंद हे हिंदी साहित्याचे एक महान लेखक होते, ज्यांना कथा सम्राट म्हणून ओळखले जाते. त्यांनी हिंदी आणि उर्दू दोन्ही भाषांमध्ये लेखन केले आणि त्यांच्या साहित्यात सामाजिक वास्तववाद, राष्ट्रवाद आणि सामाजिक न्याय यासारख्या विषयांवर भर देण्यात आला. प्रेमचंद यांचे साहित्य समाजापर्यंत पोहोचवणे ही आम्हा शिक्षकांची आणि वाचकांची जबाबदारी आहे. सूत्रसंचालन प्रो.डॉ. संतोषकुमार यशवंतकर यांनी केले. प्रास्ताविक डॉ. युवराज मुळये यांनी तर डॉ. शेख मुखत्यार यांनी पाहण्यांचा परिचय करुण दिला. डॉ. हिरा पोटकुले यांनी आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तिन्ही महाविद्यालयातील शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## 'जीवनाच्या सार्थकतेसाठी शिवमहापुराण मनामनात जागृत ठेवावे'

### बीडमध्ये शिवपुराण कथेच्या सांगतेप्रसंगी ज्ञानेश्वर माऊली थोरात यांचे आवाहन





**बीड (प्रतिनिधी):** शिवमहापुराण हा ग्रंथ आपल्याला देव, देश आणि धर्माची शिकवण देतो. भोलेनाथांच्या विविध लीला आणि सुंदर प्रसंगाने पावन झालेला शिवमहापुराण हा महान ग्रंथ असून भक्ती आणि शक्तीने पवन झालेला ग्रंथ असून शिवमहापुराण कथा मनामनात जागृत ठेवा, जीवन धन्य होईल असे आवाहन शिवमहापुराण कथा प्रवक्ते ज्ञानेश्वर माऊली थोरात यांनी गुरुवारी कथेच्या सांगतेप्रसंगी उपस्थित भाविकांना केले.

पेठ बीड भागातील पौराणिक श्री रामेश्वर महादेव मंदिर काकू- नाना मळा येथे श्रावणमास निमित्ताने दि. २५ पासून शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले कथेत भगवान भोलेनाथ, माता पार्वती, बाल गणेशासह विविध देवीदेवतांची सुंदर आकर्षक देखावे सादर करण्यात आले. कथा सांगतेप्रसंगी यावर्षीच्या कथेचे यजमान रमेश घोडके व परिवाराच्यावतीने ग्रंथ पूजन, महाराजांचे, सह वादक कलावंताचे पूजन करण्यात आले. कथा प्रवक्ते श्री. ज्ञानेश्वर माऊली महाराज थोरात जालनेकर यांच्या अमृतवाणीतून दि.३१ पर्यंत संगीतमय शिवमहापुराण कथेची गुरुवारी य शिवमहापुराण सांगता झाली. कथे दरम्यान रामेश्वर मंदिर परिसर भाविकांच्या लक्षणीय उपस्थितीने भरुन पावला. शिव महापुरात कथेच्या शेवटी यजमान रमेश घोडके व परिवारातील सदस्य, जयसिंग मामा चुंगडे, संतोष टवाणी, अशोक राऊत, दत्तात्रय लांडे, भागिरथ उपरे, भारत मस्के, मारोती कुटे, शिंदे मामा, नाईकवाडे, वैष्णव साहेब, फटाले, सिकची काकाजी, सारडा आदींसह महिला, पुरुष भाविकभक्तांच्या उपस्थितीत महाआरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. यावेळी शहरातील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## टिपरे महोत्सवात ओम ग्रुप प्रथम पारितोषिकाचा मानकरी

**गेवराई (प्रतिनिधी):-** शारदा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित टिपरे महोत्सवात टिपरे स्पर्धा सांघिक मध्ये ओम ग्रुप प्रथम पारितोषिकाचा मानकरी ठरला. संघर्ष क्रीडा मंडळ द्वितीय पारितोषिकाचे मानकरी ठरले तर तृतीय पारितोषिक जगदंबा ग्रुपला आणि उत्तेजनार्थ अनुक्रमे सावतानगर ग्रुप आणि झुंजार ग्रुपला प्रदान करण्यात आले. टिपरे महोत्सवाचे आयोजक आ. विजयसिंह पंडित आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत उपस्थितीमध्ये स्पर्धेतील विजेत्यांना रोख रक्कम व स्मृती चिन्हाचे वाटप करण्यात आले.

आ. विजयसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवार दिनांक ३० जुलै रोजी गेवराई शहरातील बाजार तळावर टिपरे महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. शंभर वर्षाची परंपरा लाभलेल्या टिपरी व सोंग कला प्रकाराचा आस्वाद घेण्यासाठी गेवराई शहरातील तसेच परिसरातील महिला मुले आणि नागरिकांनी गर्दी केली होती. स्पर्धेमध्ये ११ संघ सहभागी झाले होते. टिपरे स्पर्धेत प्रथम ओम ग्रुपला रोख ३३३३३ रुपये व स्मृतिचिन्ह, द्वितीय संघर्ष ग्रुपला रोख २२२२२ रुपये व स्मृतिचिन्ह, तृतीय जगदंबा ग्रुपला रोख ११११११ रुपये व स्मृतिचिन्ह आणि उत्तेजनार्थ रोख ५५५५ रुपये व स्मृतिचिन्ह अनुक्रमे सावतानगर व झुंजार ग्रुपला प्रदान करण्यात आले. उत्कृष्ट पात्र सजावटीमध्ये प्रथम पारितोषिक रोख रुपये ५००० आणि स्मृतिचिन्ह झुंजार गटाच्या स्पर्धकाला मिळाले. फासावर लटकलेला शेतकरी हे पात्र त्यांनी सादर केले होते. द्वितीय पारितोषिक रुपये ३००० रोख व स्मृतीचिन्ह यांना तर तृतीय पारितोषिक रोख रुपये २००० व स्मृतीचिन्ह क्रांती ग्रुपच्या बंजारा महिलेचे वेशभूषा केलेल्या कलाकाराला. उत्कृष्ट पात्र सजावटीमध्ये लक्षवेधी पात्र सजावट मध्ये रोख रुपये १००९ व स्मृतिचिन्ह अनुक्रमे शिवछत्र ग्रुपच्या काळा शंकर, गणेशनगरच्या अर्धनारी नटेश्वर, अमिताभ बच्चनची वेशभूषा केलेला कलाकर, बळीवंश मोटे (नृत्यांगना), कुचीपुडी संघर्ष ग्रुप, कृष्णाचे निळी वेशभूषा छत्रपती ग्रुप तर झुंजार ग्रुपच्या पांढरी चेटकीन या पात्रात मिळाले. उत्कृष्ट उत्कृष्ट सोंग मध्ये प्रथम रोख ५००० व स्मृती चिन्ह कोळी परिवाराचे सोंग घेतलेल्या कलाकारांना मिळाले तर द्वितीय रोख ३००० रुपये व स्मृतीचिन्ह जगदंबाग्रुपच्या सिंधुताई सपकाळ यांचे सोंग घेतलेल्या कलाकाराला मिळाले. तृतीय रोख २००० रुपये व स्मृतीचिन्ह गणेश नगर ग्रुपच्या छत्रपती शिवरायांची वेशभूषा केलेल्या कलाकाराला मिळाले. उत्तेजनार्थ पारितोषिक रोख १५०० व स्मृतिचिन्ह सावता नगर ग्रुपच्या बाल वधू या सोंगाला मिळाले. उत्कृष्ट वाद्य वादन वैयक्तिक मध्ये प्रथम पारितोषिक रोख ३००० रुपये व स्मृतिचिन्ह ओम ग्रुपच्या अमरदीपला मिळाले. द्वितीय पारितोषिक रोख २००० रुपये व स्मृतिचिन्ह क्रांति ग्रुपच्या पद्माकरला संबळ वादनाबद्दल मिळाले. तृतीय पारितोषिक रोख १५०० महेश दाभाडे यांना प्रदान करण्यात आले. उत्तेजनार्थ अनुक्रमे रोख १००० रुपये व स्मृतिचिन्ह गणेश नगरच्या दिलीप मोटे आणि लल्ला उमाप यांना उत्कृष्ट वादनाबद्दल प्रदान करण्यात आले.

# बीड शहर स्वच्छतेसाठी व्यापारी आक्रमक, मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

**बीड :** नगर परिषद हद्दीतील आठवडी बाजार भाग, मोमीनपूरा मुख्य रस्ता, नवीन भाजी मंडई परिसर, राजीव गांधी चौक परिसर, नगर नाका मच्छि मार्केट परिसर व पालवन चौक आदीसह शहरातील अनेक भागामध्ये मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य निर्माण झाले असून पालिकेकडून मुलभूत सुविधांकडे दुर्लक्ष केले जात असल्याने शहरातील व्यापाऱ्यांच्या वतीने शहर स्वच्छतेसाठी पालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

नगर परिषद हद्दीतील दैनंदिन व आठवडी बाजार मधील व्यापारी यांच्याकडून ठेकेदार मार्फत कर म्हणून १० व २० रुपये घेतले जातात, मात्र ज्या जागी आठवडी बाजार, नवीन भाजी मंडई, पालवन चौक, मोमीनपुरा या भागामध्ये हे व्यापारी बसतात त्याजागी स्वच्छता कर्मचाऱ्याकडुन स्वच्छता केली जात नसल्यामुळे आम्हाला घाणीवर बसून आमचा व्यापार करावा लागत आहे. असल्याचे निवेदनात म्हटले आहे. घाणीच्या दुर्गंधीमुळे आम्हाला रोगराईचा धोका निर्माण होत असून भाजीपाला व फळांवर गंभीर स्वरुपाचे जंतू बसत असल्यामुळे जनतेचे आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. यासह अन्य मागण्यांसाठी व्यापारी आक्रमक होऊन मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. यावेळी आठवडी बाजार दर रविवारी सकाळी पुर्ण पणे स्वच्छ करुन द्यावा, आठवडी बाजारामधील मोकाट जनावरे कोंडवाडयामध्ये टाकावे, भाजी मार्केटमधील घाण आठवडयात तीन वेळेस काढून हा परिसर स्वच्छ करण्यात यावा, आदी मागण्यांचा समावेश असून या मागण्या पूर्ण न झाल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.



# नियोजन समितीच्या कामांना सप्टेंबर नंतर मिळणार नाही प्रशासकीय मान्यता

बीड (सरकरार): नियोजन समितीचा निधी राजकीय सोय पाहून आर्थिक वर्षाच्या शेवटच्या एक दोन महिन्यात खर्च करण्याच्या पायंड्याला आता ब्रेक लागणार आहे. यापुढे नियोजन समितीच्या कामांना मंजुरी कधी द्यायची याचा कालबद्ध कार्यक्रमच नियोजन विभागाने आखून दिला असून सप्टेंबर नंतर नियोजन समितीच्या कोणत्याही कमला प्रशासकीय मर दिली जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे आता राज्यभरात २ महिन्याच्या आत नियोजन समित्यांच्या कामांना प्रशासकीय मंजुरी द्यावी लागणार आहे.

जिल्हा नियोजन समित्यांमार्फत जिल्ह्यातील विकासकामे केली जातात. नियोजनाच्या या निधीकडे जिल्ह्यातील सर्वच लोकप्रतिनिधी, राजकीय पक्षांचे पदाधिकारी, नियोजन समिती सदस्य यांचे लक्ष असते. पालकमंत्री हे जिल्हा नियोजन समितीचे अध्यक्ष असल्याने त्यांच्या मंजुरीनेच जिल्हा नियोजन समितीचा निधी वितरित केला जातो.

नियोजन समितीच्या निधीचा खर्च आर्थिक वर्षातील प्रत्येक तिमाहीत समान खर्च व्हावा असे अपेक्षित असले तरी बहुतांश वेळा आर्थिक वर्षाच्या शेवटी या कामांना प्रशासकीय मंजुऱ्या दिल्या जातात आणि नंतर मग घाईघाईत कामे 'उरकली' जातात. राज्यात बहुतांश ठिकाणी हाच पायंडा पडलेला आहे. आता मात्र याला ब्रेक लागणार आहे.

नियोजन समितीमार्फतची कामे कशी



करायची याचे वेळापत्रकच राज्याच्या नियोजन विभगाने आखून दिले आहे. त्यानुसार आता नियोजन समितीच्या माध्यमातून घ्यायच्या कामांना एप्रिल ते जून महिन्यातच प्रशासकीय मंजुरी द्यावी लागणार आहे. तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून घेतल्या जाणाऱ्या कामांना एप्रिल ते सप्टेंबर या कालावधीतच मंजुरी दिली जाणार आहे. यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्याकडील कामे सर्वसाधारण समितीच्या मान्यतेने ऑगस्ट अखेर जिल्हाधिकाऱ्यांना कळविणे बंधनकारक करण्यात आले आहे. २५-२६ या आर्थिक वर्षासाठी आता सप्टेंबर अखेर सर्व मंजुऱ्या पूर्ण कराव्या लागणार आहेत.

नियोजन समितीच्या माध्यमातून घेतल्या जाणाऱ्या कामांमध्ये १० लाखांपेक्षा अधिकची कामे इ टेंडर प्रक्रियेद्वारे कारवाईची आहेत. तसेच यादरची प्रक्रिया टाळण्यासाठी विकासकामांचे तुकडे केले जाऊ नयेत, अशा कामांना मंजुरी देऊ नये असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून पूर्ण करण्यात आलेल्या कामांपैकी किमान १० % कामांना जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेट देणे तर उपयुक्त नियोजन यांनी ५ % कामांना प्रत्यक्ष भेट देणे सक्तीचे करण्यात आले आहे. या दोन्ही अधिकाऱ्यांना आपल्या या भेटींचा त्रैमासिक अहवाल शासनास द्यावा लागणार आहे.

# आदित्य पाटील यांची काँग्रेस कमिटीच्या महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीसपदी निवड

केज (सरकार) काँग्रेसचे युवा नेते तथा केज नगरपरिषचे माजी नगराध्यक्ष आदित्य अशोकराव पाटील यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या सरचिटणीस पदी निवड करण्यात आली. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये त्यांना मानाचे स्थान मिळाले आहे.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे युवा नेते आदित्य पाटील मागच्या अनेक वर्षांपासून काँग्रेसचे सक्रिय पदस्थ तथा संघटनात्मक काम करत आहेत.नगरपरिषदेचे नगराध्यक्ष भूषवले ,उपनगराध्यक्ष पदावर दमदार काम केले. विद्यमान नगरसेवक पदावर काम करताना नगरपंचायत च्या माध्यमातून केज शहराच्या विकासात गती देण्यासाठी आदित्य पाटील यांनी योगदान दिले. आहे.



त्यांचा बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील प्रश्न सोडवण्यासाठी सक्रियपणे सहभाग आहे.

सदभावना पदयात्रेने सामाजिक सलोखा जपला

बीड जिल्ह्यातील सामाजिक घडी विस्कटली होती.त्यावेळी आदित्य पाटील यांनी काँग्रेस माध्यमातून सदभावना मसाजोग ते बीड पदयात्रा काढली. या पदयात्रेत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ स्वतः पदयात्रेत पायी चालले. पदयात्रेत राज्यभरातून हजारो पदयात्री सहभागी झाले होते.

सामाजिक क्षेत्रातील नागरिकांनी मोठा सहभाग नोंदवला होता. महाराष्ट्रामध्ये यानंतर विविध ठिकाणी पदयात्रा काढण्यात आल्या. पदयात्रेच्या माध्यमातून दुभंगलेली मने जोडण्याचा दोन समाजातील तेढ दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. न्यायासाठी सरकारला धारेवर धरण्यात आले होते. काँग्रेसने काढलेल्या पदयात्रेचे राज्यभर कौतुक झाले होते

माजी मंत्री अशोकराव पाटील व खा रजनीताई पाटील यांचा राजकिय वारसा लाभलेला आहे. केवळ वारसा मिळाला म्हणून नाही तर एक अभ्यासू राजकिय व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. गांधीवादी विचार घेऊन अत्यंत संयमाने राजकारणाबरोबर समाजकारण करणारे असा त्यांचा लौकिक आहे. नगराध्यक्ष पदावर काम करताना विकासात्मक दृष्टिकोन ठेवून यशस्वीरित्या कार्य केले आहे.

युवक काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष पदावर काम करताना जिल्हाभरातील युवकांना सोबत घेऊन युवक काँग्रेसचे संघटन उभा केले. कार्य निष्ठेमुळे निष्ठावान कार्यकर्ता ते युवकांचा आयकॉन बनले आहेत. सर्व जाती धर्मांना सोबत घेऊन काम करणारे युवा नेतृत्व म्हणून ओळख आहे. जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी तत्पर असतात. त्यांनी कधीही अडवाआडवीचे राजकारण केलेले नाही.

बीड जिल्ह्यामध्ये सामाजिक चळवळीतही आदित्य पाटील अग्रेसर राहिलेले आहेत काँग्रेस पक्ष बांधणी यामध्ये पाटील यांचे मोठे योगदान आहे या कार्याची दखल घेऊन त्यांची प्रदेश सरचिटणीस पदी निवड करण्यात आली आहे. माजी खा.रजनीताई पाटील, अशोकराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी युवक काँग्रेसमध्ये असताना मोठ्या प्रमाणावर पक्षाची संघटनात्मक बांधणी केलेली आहे. सदर कार्याची दखल घेऊन काँग्रेस कमिटीच्या वतीने त्यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या सरचिटणीस पदावर निवड करण्यात आली. यापुढील काळामध्ये काँग्रेस पक्षवाढीसाठी सर्वांना सोबत घेऊन काम करणार असल्याचे पाटील यांनी सांगितले त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचा विविध ठिकाणी सत्कार करण्यात आले निवडीबद्दल शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे.सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# साहित्यरत्न अणणाभाऊ साठे जयंती उत्साहात

## विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे धनादेश वाटप

बीड (सरकार)साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळातर्फे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. या कार्यक्रमात महिला समृद्धी योजनेतील लाभार्थ्यांना कर्ज वाटप करण्यात आले, तसेच दहावी, बारावी आणि पदवीधर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे धनादेशही वितरीत करण्यात आले.

कार्यक्रमाला समाजकल्याण सहाय्यक आयुक्त प्रदीप वेणू मुरलीधर भोगले आणि जात पडताळणी विभागाच्या संशोधन अधिकारी श्रावस्ती मेश्राम उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष नामदेव कुंटेवाड आणि गणेश महादेव पारवे यांनी केले, तर आभार प्रणिता रामचंद बोराळे यांनी मानले.

# ना.पंकजाताई मुंडे यांच्या कार्यालयात अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी

परळी (सरकार) साहित्याच्या माध्यमातून समाजात क्रांतीची ज्योत पेटवणारे, उपेक्षितांच्या वेदनांना शब्दांतून वाचा फोडणारे महान विभूती, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती आज भारतीय जनता पार्टीच्या वतीने महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण, पशुसंवर्धन मंत्री मा.ना.पंकजाताई मुंडे यांच्या संपर्क कार्यालयात मोठ्या उत्साहात आणि आदराने साजरी करण्यात आली. यावेळी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी भाजप शहराध्यक्षा सौ. उमाताई समशेट्टी यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रेरणादायी जीवनकार्यावर प्रकाश टाकला. त्या म्हणाल्या, अण्णाभाऊ साठे हे केवळ एक साहित्यिक नव्हते, तर ते सर्वसामान्यांच्या संघर्षाचा बुलंद आवाज होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, शिक्षणाचे कोणतेही पाठबळ नसताना त्यांनी आपल्या लेखणीतून समाजातील विषमतेवर आणि अन्यायावर कोरडे ओढले. 'ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नाही, तर दलितांच्या आणि कामगारांच्या तळहातावर तरलेली आहे' हा



त्यांचा विचार आजही तितकाच प्रेरणादायी आणि क्रांतीकारक आहे. त्यांचे जीवन आणि साहित्य हे आम्हा सर्वांसाठी ऊर्जेचा स्रोत आहे. दगड आहे. यावेळी भाजपचे युवा नेते मुरलीधर पारवे यांनीही अण्णाभाऊ साठे यांच्या संघर्षमयी जीवनावर प्रकाश टाकला.

या कार्यक्रमास मा.ना.पंकजाताई मुंडे यांचे स्वीय सहायक पी.के.बडे, राजेंद्र ओझा, उमेश खाडे, अश्विन मोगरकर, सुशिल हरंगुळे, बंडू नाना कोरे, राहुल घोबाळे, वर्षाताई जोशी, चंदाताई ठोंबरे, प्रशांत कराड, विजय दहिवाळ, गोपी कांगणे, श्रीपाद शिंदे, महादेव कंडुकटले, वैजनाथ रेकने, मुरलीधर पारवे, उमेश निळे, अच्युत जोगदंड, दिलीप नेहरकर, अनिस शेख, पवन तोडकरी, संदीपान तांबे, विलास पारवे, सुरेश खराटे, कृष्ण बेदरकर, मिलिंद कांबळे, दत्ता क्षीरसागर, रमेश पारदे, राजाभाऊ मुंडे यांच्यासह भाजपचे विविध पदाधिकारी, नगरसेवक, युवा मोर्चाचे कार्यकर्ते आणि महिला आघाडीच्या सदस्यांसह असंख्य कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी मिळून लोकशाहिरांच्या स्मृतीस वंदन केले आणि त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प केला.

# नवगण महाविद्यालयात रॅगिंग विरोधी कार्यक्रम

परळी (सरकार): नवगण महाविद्यालय, परळी वैजनाथ येथे आज, शनिवार, ०२ ऑगस्ट २०२५ रोजी अँटी रॅगिंग कमितीच्या वतीने *रॅगिंग समस्या व उपाय* या विषयावर एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. बळीराम राख आणि डॉ. लालासाहेब घुमरे यांची उपस्थिती होती.



या कार्यक्रमात ऍड. अतिष पोतदार यांनी रॅगिंगच्या समस्येवर सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी रॅगिंगच्या दुष्परिणामांवर प्रकाश टाकला आणि विद्यार्थ्यांना रॅगिंगविरोधी उपायांची माहिती दिली. रॅगिंग ही एक गंभीर समस्या असून, त्यावर कठोर कारवाई करण्याची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. तसेच, रॅगिंगविरोधी कायद्यांची माहिती देत विद्यार्थ्यांना रॅगिंगच्या घटना रोखण्यासाठी काय करता येईल, याबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुदर्शन अवस्थी यांनी केले.सूत्रसंचालन डॉ. मचाले यांनी तर डॉ पोकळे यांनी आभार आभार मानले. प्राचार्य डॉ. बळीराम राख यांनी विद्यार्थ्यांना रॅगिंगविरोधी संदेश दिला. त्यांनी महाविद्यालयात रॅगिंगमुक्त वातावरण निर्माण करण्याच्या गरजेवर भर दिला आणि विद्यार्थ्यांना यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती. अँटी रॅगिंग कमितीने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले.

# 'SEED' योजनेसाठी ३ ऑगस्टपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

बीड (सरकार): केंद्र शासनाच्या वतीने डीएनटी, एनटी आणि एसएनटी समुदायातील विद्यार्थ्यांसाठी मोफत कोचिंगची 'SEED' योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी https://www.buddy4study.com/application/FCDNT-instruction या लिंकवर ३ ऑगस्टपर्यंत नोंदणी करण्याचे आवाहन इतर मागास बहुजन कल्याणचे सहायक संचालक डी. बी. क्षीरसागर यांनी केले आहे. या योजनेसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी काही अटी आहेत. यासाठी विद्यार्थी १२ वी उत्तीर्ण आणि कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाखांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. तसेच, विद्यार्थी अन्य कोणत्याही सरकारी कोचिंग योजनेचा लाभ घेतलेला नसावा. अधिक माहितीसाठी mosjebuddy-4study.com या ईमेलवर किंवा ८०४७४९५११८ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त जिव्हाळा बेघर निवारा केंद्राच्या कार्यकर्त्यांचा नागरी गौरव



बीड (सरकार): संघर्ष हा जगण्याचा श्वास असतो आणि सेवा हेच खरे आयुष्य!..साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरात घडलेला एक प्रसंग हा केवळ कार्यक्रम नव्हता, तर तो होता संघर्षशील सेवेला दिलेला एक भावनिक सलाम...! उत्कर्ष मोमीन सर, रोहित चव्हाण सर आणि युवाशक्ती मित्र मंडळ, बीड यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या विशेष कार्यक्रमात सुप्रसिद्ध लोकगायिका कडूबाई खरात यांनी सादर केलेल्या जाज्वल्य लोकगीतांनी उपस्थित हजारो नागरिकांच्या हृदयाला हात घातला. अण्णाभाऊंच्या विचारांची आणि कष्टाची आठवण त्यांच्या सूरांनी जागवली.

# अण्णा भाऊ साठेंचे साहित्य परिवर्तनाला दिशा देणारे-प्राचार्य डॉ.सरकटे

गढी (सरकार): जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शिवाजीनगर गढी येथे साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने साजरी करण्यात आली.या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मराठी विभागाचे प्रा. डॉ. रमेश रिंगणे तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफे. डॉ. सदाशिव सरकटे हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. रमेश रिंगणे यांनी असे प्रतिपादन केले की अण्णा भाऊ साठे हे एक थोर समाजसुधारक, लोककवी, लेखक व कादंबरीकार होते.

अण्णा भाऊ साठे यांचे शिक्षण फारसे झाले नव्हते. तरीही त्यांनी अनेक उत्कृष्ट कादंबऱ्या व कथांचे लेखन केले त्यांना आपण पोवाडे, लावणी रचनाकार व शाहीर म्हणून ओळखतो. फकीरा ही त्यांची खूप गाजलेली कादंबरी आहे या कादंबरीला राज्य शासनाकडून सर्वोत्कृष्ट मराठी कादंबरी म्हणून गोरविण्यात आले आहे त्यांनी तयार केलेल्या कादंबरीवर अनेक चित्रपटही निघाले आहेत.अण्णा भाऊ साठे यांनी तमाशा या लोककलेस लोकनाट्य असा दर्जा प्राप्त करून दिला. त्यांनी आपल्या साहित्यातून सामाजिक विषमता,भारतीय स्वातंत्र्यलढा याविषयी जनजागृती केली. शोषित पीडित व कामगारांच्या हक्कासाठी त्यांनी प्रखर आंदोलने करुन त्यांना हक्क मिळवून दिले. लोकमान्य टिळक यांच्याविषयी बोलताना ते म्हणाले की स्वराज्याची सिंहगर्जना करणारे बाळ गंगाधर टिळक भारतीय इतिहासात नेहमीच अजरामर राहतील.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.जयराम ढवळे, प्रा. श्रीकिसन लोणकर, सांस्कृतिक विभागाचे प्रोफे. डॉ. शिवलाल घुगे यांच्यासह प्रोफे. डॉ. रामहरी फाटक, प्रोफे. डॉ. धर्मराज कटके, प्रा. डॉ. रामदास खताळ, प्रोफे. डॉ. अयोध्या पवळ,प्रा डॉ. तब्बस्सूम इनामदार, प्रा डॉ.महादेवी फड, प्रा. सुप्रिया डोंगरे, प्रा.शिल्पा ससाणे,प्रा. डॉ. कलंदर पठाण, प्रा.अनिल गोंजारे, प्रा. चेतन इंगोले, प्रा. अजित काळे यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.



**बीड : साहित्य सम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती निमित्त शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी अभिवादन केले, मीराताई नवले सोबत रवी वाघमारे, नवनाथ प्रभाळे, राजाभाऊ हुरकुडे सह आदी.**

# अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त डॉ.क्षीरसागर दांपत्याकडून अभिवादन

बीड (सरकार) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शहरातील विविध कार्यक्रमास उपस्थित राहून डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी



अभिवादन केले.

शहरातील अर्धाकृती पुतळ्यास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पुष्पहार अर्पण अभिवादन केले. यावेळी नगरसेवक गणेश वाघमारे, विनोद हातागळे, गोपाळ धांडे, अमोल पौळ, स्वप्नील हातागळे, प्रकाश कानगावकर, अमर विद्यागार, नाना मस्के, संगीताताई वाघमारे, मुन्ना गायकवाड, संजय वाघमारे, पांडुरंग सुतार, विशाल मोरे आदी उपस्थित होते. तसेच, कल्पतरूच्या सचिव डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी शहरातील रामतीर्थ परिसरातील अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन केले. यावेळी गोरख मोमीन, विशाल बोबडे, सागर पाटोळे, निलेश लोंढे, नितीन आरे, विजय रोकडे, अशोक धुताडमाल, संगीता बाबरे, संजीवणी कानडे, संगीता कांबळे यांच्यासह नागरिकांची उपस्थिती होती.

हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड-४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९
(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही- वाद बीड न्यायालया अंतर्गत)

Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779
(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)